महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट राज्य, मुंबई.
कार्यालय महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, व्यवस्थापकीय संचालक
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता: डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर-४४००२२
दूरध्वनी क्र.०७१२-२९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL184705 ई-मेल : mahajyotingp@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/ 2843/२०२३ दि.२८/१२/२०२३

# -: परिपत्रक :-

महाज्योती मार्फत दिल्या जाणाऱ्या यूपीएससी परीक्षा प्रशिक्षणाकरिता दिनांक १४/१२/२०२३ रोजी विद्यार्थ्यांचे निवड सूची प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तथापि निवड सूचीतील काही उमेदवार प्रशिक्षण संस्थेमध्ये रुजू न झाल्यामुळे, त्याजागी प्रतीक्षा यादी लावून त्यामधून उमेदवार निवडण्याकरिता विद्यार्थ्यांकडून माध्यम निवडण्याकरिता लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. तथापि आता असे निदर्शनास आलेले आहे. की अजूनही ५३९३ एवढ्या विद्यार्थ्यांनी आपले माध्यम निवडलेले नाही.

या अनुषंगाने सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, जर त्यांनी माध्यम निवडले नाही तर त्यांना कोणतीही संस्था नेमून देता येणार नाही व प्रतीक्षा यादी मध्ये त्यांचे नाव येऊ शकणार नाही. **यापूर्वी दिलेले कोणतेही संस्था निवडीचे पर्याय ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.**

करिता ज्यांनी अजूनही माध्यम निवडलेले नाही अशा विद्यार्थ्यांनी माध्यम निवडण्याकरिता याद्वारे पुनश्च संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

दिलेल्या लिंकचा वापर करून विद्यार्थ्यांनी दिनांक ३१/१२/२०२३ रोजी ११.०० (P.M.) पर्यंत माध्यम निवडीची कार्यवाही पूर्ण करावी. यानंतर कोणतीही संधी दिल्या जाणार नाही, तसेच माध्यम न निवडल्यामुळे निवडीपासून वंचित राहिल्यास त्याबाबत कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.
सर्व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी

(स्वा)
(राजेश खवले )
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले प्रशिक्षण व
संशोधन संस्था (महाज्योती) ,नागपुर